**CNR No :- MHSI100001902021**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १९/२०२१ :–

## –: निशाणी ४० वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती होऊन मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादींविरुद्ध; दि.१७.०१.२००८ रोजी प्रतिवादी क्र. ४ ने प्रतिवादी क्र. १ शी केलेले तथाकथीत हक्कसोडपत्रक व्यर्थ व निरर्थक आहे असा ठराव होण्यासाठी व ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ रमेश पेंढारकर हे दि.२५.०६.२०२३ रोजी घोडबंदर, जि. ठाणे येथे मयत झाले. त्यांचे पश्चात त्यांना खालीलप्रमाणे वारस :–

१. रश्मी रमेश पेंढारकर (पत्नी),
   रा. माठेवाडा, सावंतवाडी,
   ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

२. श्री. प्रसाद रमेश पेंढारकर (मुलगा),
   रा. रुणवाल इस्टेट, फ्लॅट नं. इ–८–१०१,
   पहिला मजला, आर मॉलच्या पाठीमागे,
   घोडबंदर रोड, ठाणे, पश्चिम ४००६०७

येणेप्रमाणे मयतास वारस असुन त्याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. सदरचा अर्ज मुदतीत आहे. सबब न्यायाच्या पुर्ण पुर्ततेसाठी मयताचे वारस

अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेसाठी व तशी दुरुस्ती दाव्यात करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ४ हे कुलअखत्यारी होते व त्यांचे काम हे कुलअखत्यारपत्र व दिलेला दस्त याचेपुरता मर्यादीत आहे. याबाबीशी मयताचे वारसांचा कोणताही संबंध नाही. कुलअखत्यारी यांचे वारस हे रेकॉर्डवर आणणेचे कोणतेही कारण या दाव्याचे कामी नाही व तसा कोणताही अधिकार वारसांना प्राप्त होत नाही. वादी यांनी सदरचा अर्ज हा दाव्यास विलंब व्हावा यासाठी केलेला आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्याद्वारे केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. या दाव्यामध्ये वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ४ यांनी संगनमत करुन वादीस; प्रतिवादी क्र. ४ च्या नावे खोटया कुलअखत्यारपत्रावर सही करण्यास भाग पाडले व त्या कुलअखत्यारपत्रानुसार प्रतिवादी क्र. ४ हा फक्त वादीचा अखत्यारी होता असे वादीचे म्हणणे नाही आणि वादीने प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे संगनमताविषयी देखील दाव्यात नमुद केलेले आहे. या कारणास्तव वादीचा प्रतिवादी क्र. ४ विषयी दाद मिळविण्याचा अधिकार अबाधीत राहतो. वादी

अभिलेखासदरी घेत असलेले प्रतिवादी क्र. ४ चे वारस खालीलप्रमाणे :–

१. **रश्मी रमेश पेंढारकर (पत्नी),**
**रा. माठेवाडा, सावंतवाडी,**
**ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.**

२. **श्री. प्रसाद रमेश पेंढारकर (मुलगा),**
**रा. रुणवाल इस्टेट, फ्लॅट नं. इ–८–१०१,**
**पहिला मजला, आर मॉलच्या पाठीमागे,**
**घोडबंदर रोड, ठाणे, पश्चिम ४००६०७**

अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ४ रमेश दत्ताराम पेंढारकर हे दि.२५.०६.२०२३ रोजी मयत झाले व वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.०४.०८.२०२३ रोजी दाखल केला आहे. वादीने विहीत मुदतीत मयताच्या वारसांबाबत तजवीज केल्याचे दिसून येते. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता खर्चाबाबत कोणताही आदेश पारीत न करता अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे पारीत करण्यात येत आहे :–

**–:: आदेश ::–**

१. निशाणी ४० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2024.06.14 16:13:43 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १४.०६.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.